# रासेयोच्या नवप्रवेशित विद्यार्थ्यांचे प्रशिक्षण शिबिर



**देगलूर / प्रतिनिधी**

अडत व्यापारी शिक्षण संस्था संचलित, देगलूर महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने नवप्रवेशित विद्यार्थ्यांचे प्रशिक्षण शिबिर नुकतेच पार पडले. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. मोहन खताळ होते. प्रमुख मार्गदर्शक म्हणून प्रा.डॉ. अशोक टिपरसे, प्रा.डॉ. सर्जेराव रणखांब तर उपप्राचार्य डॉ. अनिल चिद्रावार व कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. उत्तमकुमार कांबळे यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रशिक्षण शिबिराची सुरुवात महात्मा गांधी व संत गाडगे महाराज यांच्या प्रतिमा पूजनाने झाली. प्रारंभी स्वागत गीताने मान्यवरांचे स्वागत करण्यात आले. भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त 'मेरी माटी मेरा देश' उपक्रम अंतर्गत घेण्यात आलेला विविध कार्यक्रमाची माहिती कार्यक्रमाचे प्रास्ताविक मध्ये रा.से.यो.कार्यक्रमाधकारी प्रा. विनोद काळे यांनी दिली.

प्रा.डॉ. अशोक टिपरसे यांनी राष्ट्रीय सेवा योजनेची ओळख विद्यार्थ्यांना करून दिली व तसेच प्रा. डॉ.सर्जेराव रणखांब यांनी राष्ट्रीय सेवा योजना व नवयुवक या विषयावर मार्गदर्शन केले. समारोपात प्राचार्य डॉ. मोहन खताळ यांनी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी राष्ट्रीय सेवा योजनेचे महत्वपूर्ण योगदान आहे, असे मत व्यक्त केले. सूत्रसंचालन प्रा.डॉ.व्यंकट खंदकुरे व आभार प्रा.गणेश क्यादारे यांनी केले .कार्यक्रमास प्रा. डॉ.संतोष येरावार, प्रा. संतोष वानोळे, प्रा. डॉ.माधव चोले, डॉ. राजेश्वर दुडूकनाळे, प्रा.साईआकाश रोटे, प्रा.शिवानंद सूर्यवंशी, प्रा.सौ.शोभा वद्येवार प्रा.सौ.देबडवार, डॉ. शेख परवीन उपस्थित होते.नवप्रवेशित विद्यार्थ्यांचे प्रशिक्षण शिबिर या कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने करण्यात आली.

Scanned with OKEN Scanner